राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Public Universities Act, 2016( Mah.Act.No VI of 2017)

व्या. परीक्षा विभाग) ;Prof. Examinations Section

**Pariksha Bhawan, L.I.T. Premises, Amravati Road, Nagpur- 440 033**

---

## परीपत्रक

क्र.रातुमनावि / व्या.परीक्षा / 367 दिनांक :– 06.06. 2022

सर्व संबधीत महाविद्यालयाचे प्राचार्य व विभागप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, उन्हाळी 2022 ची परीक्षा हि आपल्या महाविद्यालयात होम सेंटरव्दारे होत असुन या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने विद्यापीठाकडुन घेण्यात येणार आहे त्यानुसार परीक्षा केंद्राधिकारी / प्राचार्य व विद्यार्थ्यीयांनी खाली दिलेल्या निर्देशानुसार परीक्षा सुरळीत पार पाडण्यात सहकार्य करावे.

1. विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेशपत्र, प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का घेवुन वितरित करावे.
2. प्रवेशपत्रावर प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का नसल्यास परीक्षाकेंद्रावर प्रवेश मिळणार नाही.
3. विद्यार्थ्यांनी वेळापत्रकातील दिलेल्या वेळेनुसार 15 मिनीटेपुर्वी परीक्षा खोलीत प्रवेश करावा.
4. परीक्षा सुरु झाल्यानंतर 15 मिनिटाच्या नंतर विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर प्रवेश देता येणार नाही.
5. परीक्षा सुरु झाल्यानंतर 1 तासापर्यंत विद्यार्थ्यांना वर्गखोली सोडता येणार नाही.
6. सर्व परीक्षा हया विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या वेळापत्रकानुसार होतील. याची सर्व संबधीतांनी नोद घ्यावी.
7. **विद्यार्थ्यी परीक्षेस गैरहजर राहील्यास त्यांची पुर्नपरीक्षा होणार नाही याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
8. विद्यार्थ्यांनी परीक्षेदरम्यान Smart Phone, Mobile, Smart Watch इत्यादी Electronic gadgets परीक्षेच्या केंद्रात आणता येणार नाही.
9. विद्यार्थ्यांना जर काही विषयामध्ये Calculator ची गरज असल्यास त्यांना Calculator चा वापर करता येईल.
10. प्रश्नपत्रिकेत पहील्या पानावर संपुर्ण माहीती सुवाच्छ अक्षरात भरावी. तसेच प्रश्नपत्रिकेच्या प्रत्येक पानावर रोल नंबर सुवाच्छ अक्षरात नमुद करावा.विद्यार्थ्यांनी पहील्या पानावर दिलेल्या जागेवर स्वाक्षरी करावी.
11. विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिकेत √ अशी खुण फक्त निळया किंवा काळया शाहीच्या पेनंचा वापर करुन करावी. पेन्सील किंवा लाल पेनचा वापर करु नये.
12. प्रश्नपत्रिकेत एकुण 50 प्रश्न असतील, त्यापैकी विद्यार्थ्यांना 40 प्रश्न सोडवायचे आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी 40 पेक्षा जास्त प्रश्न सोडविले असतील त्यांची बरोबर असलेल्या अधिकत्तम 40 प्रश्नांनी उत्तरे (Maximum 40 Questions) ग्राहय धरल्या जाईल.
13. पेपर सोडवितांना विद्यार्थ्यांना पेपरच्या दरम्यान कच्चे टिपण किंवा रफ कामकरण्याकरीता महाविद्यालयाकडुन कोरेपेजस उपलब्ध करण्यात येतील. पेपर संपल्यानंतर वापरलेले रफ पेपर परीक्षा खोलीतील पर्वक्षेकाकडे जमा करावे.
14. विद्यार्थ्यांना जर उत्तराचा पर्याय चुकीचा वाटत असल्यास पर्याय बदलविता येईल व सदर उत्तराचा पर्याय बदलावयाचा असल्यास त्यांने तो योग्य पर्याय बदलावा. विद्यार्थ्यांने सदर बदलेल्या पर्याच्या प्रश्नासमोर पर्यवेक्षकाची स्वाक्षरी घेणे अनिवार्य आहे.
15. जर विद्यार्थ्यी पर्यवेक्षकाची स्वाक्षरी न घेता उत्तराचा पर्याय बदल केला असेल तर अशा प्रश्नांचे उत्तर तपासले जाणार नाही.
16. विद्यार्थ्यांनी परीक्षा खोलीत हस्तलिखीत, पुस्तकाची छापील प्रत किंवा इतर आक्षेपार्य मजकुर इत्याही गैरप्रकार करतांना आढळल्यास विद्यापीठाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
17. विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रीका परीक्षा संपल्यानंतर पर्यवेक्षकाकडे जमा करावी.

याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

06/06/2022

(डॉ.प्रफुल्ल साबळे)<br>
संचालक,<br>
परीक्षा व मुल्यमापन मंडळ<br>
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.